दिव्य मराठी
बीड जिल्हा 09-01-2025

# अंबाजोगाईतील योगेश्वरी महाविद्यालयाच्या १२ सायबर वॉरियर्सचा गुणगौरव, सायबरविषयी केली जनजागृती

प्रतिनिधी | अंबाजोगाई

येथील योगेश्वरी महाविद्यालय आणि \'क्विक हील'' फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणाऱ्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या अभियानांतर्गत महाविद्यालयीन पातळीवर १२ विद्यार्थ्यांना विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आले. 'क्विक हील\' फाउंडेशनच्या वतीने 'कमवा व शिका\' या योजनेअंतर्गत हे अभियान राबवण्यात येते. सायबर सुरक्षेविषयी जनजागृती करण्यासाठी व्यापक प्रमाणावर हे अभियान विविध टप्प्यांवर नियोजनबद्ध रीतीने पूर्णत्वास नेण्यासाठी एकूण २२ विद्यार्थ्यांची महाविद्यालयातून निवड करण्यात आली होती. या विद्यार्थ्यांनी अंबाजोगाई व परिसरातील शाळा, महाविद्यालये, विविध आस्थापना, एसटी महामंडळ, आठवडी बाजार, बँका आदी ठिकाणी जाऊन लोकांमध्ये सायबर सुरक्षा संबंधी जनजागृती केली. याच कार्याची दखल घेऊन पुढील १२ विद्यार्थ्यांना ३ वेगवेगळ्या श्रेणीतील विजेते व उपविजेते या पुरस्कारांनी पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. बेस्ट प्रोसेस कम्प्लायन्स श्रेणीतील विजेत्या साक्षी कुसुमकर व तृप्ती वडगावकर, उपविजेते निकिता काळे व जिजाऊ खोटे. हायेस्ट ऑफलाइन आऊटरीच या श्रेणीतील विजेत्या श्रद्धा राऊत व गायत्री फुटाणे, उपविजेते मकरंद कुलकर्णी व अभिनय वाघमारे तसेच हायेस्ट ऑनलाइन आऊटरीच या श्रेणीतील विजेते शुभम उदारे, संजय बोनगे, उपविजेते अंजली गव्हाणे व गायत्री बासटवार यांना योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, संचालक रमण सोनवलकर, प्राचार्य डॉ. एम. व्ही. कानिटकर, उपप्राचार्य डॉ. आर. व्ही. कुलकर्णी यांनी सन्मानित केले. ॲड. कमलाकर चौसाळकर यांनी सायबर सुरक्षा व दक्षता महत्त्वाची आहे हे सांगून विद्यार्थी करत असलेल्या कामाचे कौतुक केले. समन्वयक म्हणून डॉ. आर. जी. जोशी व प्रा. ऋतुजा रामदासी यांनी काम पाहिले. डॉ. महेंद्र आचार्य, डॉ. उदय थेटे, प्रा. संजय कुलकर्णी, डॉ. विनोद गंगणे यांनी पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.